# बृहन्मुंबई महानगरपालिका

## अनुज्ञापन खाते

**क्रमांक – अअ/ओडी/ ५१ /अनि, दि. ७ .१०.२०१८**

विषय : मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या याचिका क्र.६५२/२०१७ अन्वये दिलेल्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील शैक्षणिक संस्था, धार्मिक स्थळे, रुग्णालये व महानगरपालिका मंडया यांचा परिसर ना - फेरीवाला क्षेत्र म्हणुन घोषित करण्याबाबत.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या याचिका क्र.६५२/२०१७ मध्ये दि.०१.११.२०१७ च्या आदेशान्वये रेल्वे स्थानके व महानगरपालिका मंडया यापासून १५० मीटर आणि रुग्णालये, शैक्षणिक संस्था, धार्मिक स्थळे यापासुन १०० मीटरच्या परिसरात फेरीवाल्यांना व्यवसाय करण्यास बंदी घालण्यात आलेली आहे.

उपरोक्त आदेशान्वये मुंबई महानगरपालिका हद्दितील सर्व रेल्वे स्टेशनचा १५० मीटरपर्यंतचा परिसर यापूर्वीच फेरीवाला मुक्त करण्यात आला आहे. तसेच सर्व रेल्वे स्थानकापासून १५० मीटर अंतरापर्यंत सफेद रंगामध्ये सीमाकंन करण्यात आले असून तेथे ना - फेरीवाला क्षेत्र (Non Hawking Zone) आशयाचे फलक लावण्यात आले आहेत.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या याचिका क्र.६५२/२०१७ मध्ये दि.०१.११.२०१७ आदेशान्वये महानगरपालिका परिक्षेत्रातील रुग्णालये, शैक्षणिक संस्था, धार्मिक स्थळे व महानगरपालिका मंडया यांचा परिसर देखिल ना - फेरीवाला क्षेत्र म्हणुन घोषित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत, तद्नुषंगाने दि. ०९.०५.२०१८ रोजी महानगरपालिका आयुक्त तथा अध्यक्ष, नगर पथविक्री समिती यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या नगर पथविक्रेता समितीच्या बैठकीत सदर प्रस्ताव चर्चेस ठेवण्यात आला होता व सदर प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली आहे (पृ.क्र. २१)

सदर ना - फेरीवाला क्षेत्रांची यादी नागरीकांच्या माहितीसाठी व सुचनांसाठी महानगरपालिकेच्या MCGM संकेतस्थाळावर दि. ०७.०३.२०१८ रोजी प्रदर्शित करण्यात आली होती.

परिमंडळीय नगर पथविक्रेता समितीच्या अध्यक्षांकडून शैक्षणिक संस्था, रुग्णालये, धार्मिक स्थळे इत्यादींचा परिसर 'ना पथविक्रेता क्षेत्र' घोषित करण्यासाठी कोणते निकष निर्धारित करावेत याबद्दल वारंवार विचारणा होत आहेत.

यास्तव, बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील रुग्णालये, शैक्षणिक संस्था, धार्मिक स्थळे व महानगरपालिकेच्या मंडया इत्यादींचा परिसर 'ना पथविक्रेता क्षेत्र' घोषित करण्यासाठी खालील प्रमाणे निकष मा. उप-आयुक्त (फे.नि.) यांच्या मान्यतेसाठी प्रस्ताविण्यात येत आहे.

१) बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील शैक्षणिक संस्था ज्यांची पटसंख्या २५० पेक्षा जास्त आहे अशा शैक्षणिक संस्थांचा १०० मीटर चा परिसर 'प्रतिबंधित पथविक्रेता क्षेत्र' म्हणून घोषित करणे.

२) बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील महानगरपालिकेची, सरकारी, खाजगी व धर्मदाय रुग्णालये ज्यांची रुग्ण खाटांची क्षमता १०० पेक्षा जास्त आहे अशा रुग्णालयांचा १०० मीटरचा परिसर फेरीवाला प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करणे.

३) बृहन्मुंबई महानगरपालिका परिक्षेत्रातील सर्व मोठी धार्मिक स्थळे जेथे भाविकांची जास्त गर्दी असते त्यांचा १०० मीटरचा परिसर 'प्रतिबंधित पथविक्रेता क्षेत्र' म्हणून घोषित करणे.

उपरोक्त प्रतिबंधित पथविक्रेता क्षेत्रास पथविक्रेता उपविधीमध्ये अंतर्भूत करण्यात आले आहे. कृपया उप आयुक्त (फे.नि.) / अति. आयुक्त (शहर) यांचे मान्यतेसाठी सविनय सादर.

(निला वि. पतंगे)
उप अनुज्ञापन अधीक्षक

(शरद बांडे)
अनुज्ञापन अधीक्षक

(निधि चौधरी)
उप आयुक्त (फे.नि.)

5/10/18

उपआयुक्त (फेरीवाला नियमन)

(ए. एल. ज-हाड)
अति.आयुक्त (शहर)

अतिरिक्त आयुक्त
(शहर)

AMC/C/D/7647
11.10.18

D:\letters\2018 -19\उप आयुक्त (फे.नि.) ३१.०१.18.doc

अनुज्ञापन अधिक्षक